# आत्मा व वधू ही म्हणतात ‘‘ये!’’ प्रकटी. २२:१७.

वधू होण्यासाठी देह
मुक्त करणे

**मायकल जे. ब्राऊन**

# आत्मा व वधू ही म्हणतात ‘‘ये!’’

# प्रकटी. २२:१७

## वधू होण्यासाठी देह मुक्त करणे

मायकल जे. ब्राऊन

१. प्रस्तावना ........................................................ ४
२. पित्याचा दृष्टांत .................................................. ७
३. दृष्टीकोन - तुम्ही काय पाहता ................................. १३
४. विश्वास, आशा आणि प्रीती .................................... २६
५. ऐक्य आणि मोकळीक ........................................... ४५
६. पृथ्वीचे अंत ...................................................... ५९
७. आत्मा आणि वधू ............................................... ७१

## प्रास्ताविक

तुमची आकलन दृष्टी उघडली जाऊन तुमच्या पाचारणाची आशा तुम्हाला कळावी म्हणून मी आपणासाठी आताच प्रार्थना करतो. देवाच्या दृष्टीने तुम्ही मोलवान आहात. आणि ख्रिस्ताच्या शरीरात तुम्ही किती महत्त्वाचे आहा हे तुम्ही जाणता हे खरेच फार महत्त्वपूर्ण आहे. प्रत्येक सदस्य त्या ध्येयाप्रत वाटचाल करताना, आम्ही जसे असावे तसे नाही, व या जगात देवाचे गौरव आमच्याद्वारे होत नाही हे समजेल.

येशू म्हणाला, त्याचे शब्द आत्मा व जीवन आहेत. आणि मी प्रार्थना करो जे जीवन आहेत. आणि मी प्रार्थना करतो जे वचन तुम्ही वाचता ते केवळ समजू नये तर त्याद्वारे जीवन मुक्त व्हावे, तुमच्या मध्ये असणारे ख्रिस्ताचे जीवन, त्याद्वारे सर्व जगभर देवाचे राज्य मुक्त व्हावे.

# पाठ १

## प्रस्तावना

मंडळीचे भविष्य काय? आम्ही कोणत्या आघाडीत आहोत? आमच्यासाठी देवाची योजना काय आहे?

एके दिवशी मी बारकाईने विचार करीत असताना प्रभू मला म्हणाला, जर मला भविष्य जाणून घ्यायचे असेल, तर मला शेवटास जाऊन सिंहावलोकन करावे लागेल. ते खरेच गूढ होते! म्हणून मी ते केले, मी मंडळीचे भविष्य पाहिले, आमच्या माहितीनुसार काळाची परिणीतीनुसार पिता जगाच्या स्थापनेपासून एक गोष्ट करीत आहे, त्याच्या पुत्रासाठी वधू शोधत आहे. आत्मा व वधू ही म्हणतात ''ये!''

**प्रगटी २२ः१७ आत्मा आणि वधू ही म्हणतात, ''ये!'' आणि जे ऐकतात तेही म्हणतात, ''ये!''** जो कोणी तहानेला असेल त्याने यावे, ज्यांची इच्छा असेल त्याने जीवनाचे पाणी ही मोफत देणगी घ्यावी.

देवाच्या सार्वकालिक वचनाची घोषणा होण्यापूर्वी लिहिलेली ही शेवटची गोष्ट आहे. याविषयी विचार करा. आत्मा आणि वधू म्हणतात ''ये!'' मग तो म्हणतो, ऐकणारा ही म्हणो, ''ये!''

हे सात मंडळ्यास दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे वाटते. ''आत्मा मंडळ्यांस काय म्हणतो ते ज्याला कान आहेत तो ऐको!''

आम्ही पवित्र आत्म्याचे ऐकणार की इतर कोणाचे ऐकत आहो? या जगात अनेक वेगवेगळे संदेश सांगणारे अनेक आवाज आहेत. आम्ही कोणाचे ऐकणार आहो?

अनेक लोकांना वाटते, तो अंतिम उत्कर्ष बिंदू येईल तेव्हा येशू पुन्हा येईल या घटनेत त्याचा सहभाग पहाण्यासाठी ते वचन पाहणार नाहीत. आम्ही जी मंडळी, ख्रिस्ताचे शरीर ते देवाने जी महान संधी आम्हाला दिली ती ओळखत

नाही.

याचे एक उदाहरण पवित्र शास्त्रात आपण पाहू या.

दानिएल बाबेल देशात गुलाम होता. प्रार्थना व वचनाद्वारे देवाचा शोध घेत होता.

दानी. ९:२

मी दानीएल शास्त्रग्रंथावरून समजलो की, यरुशलेमेच्या ओसाड दशेचा काळ पुरा होण्यास सत्तर वर्षे लागतील, असे परमेश्वराचे वचन यिर्मया संदेष्ट्याला प्राप्त झाले होते.

दानीएल संदेषट्यांची पुस्तके वाचत होता, ह्यावरून त्याच्या लक्षात आले की देवाच्या लोकांना बंधमुक्त करण्याची त्याला संधी आहे. त्याने काय केले? तो ज्या काळात राहात होता त्याविषयी चिंता, आणि देवाचे सर्व लोक बंदीवासामध्ये होते हे किती भयंकर होते, आणि त्यांच्यासाठी असणारी योजना ते कधी पूर्ण करू शकणार नाहीत?

चला पाहूया :

दानी. ९:३-४

३ हे जाणून **मी आपले मुख प्रभू देवाकडे लावून प्रार्थना, विनवण्या, उपास, गोणताट नेसणे व अंगावर राख उधळणे हे चालू केले.**

४ मी आपला देव परमेश्वर ह्याची प्रार्थना करून पापांगीकार केला तो असा : प्रभो, हे थोर व भयावह देवा, जे तुझ्यावर प्रेम करतात व तुझ्या आज्ञा पाळतात त्यांच्याबरोबर तू आपला करार पाळून त्यांच्यावर दया करतोस;

दानी.९:१९-२२

१९ हे प्रभू, ऐक; हे प्रभू, क्षमा कर; हे प्रभू, ऐक, कार्य कर; विलंब लावू नकोस; हे माझ्या देवा, तुझे नतर व तुझे लोक ह्यांना तुझे नाम दिले आहे; म्हणून तुझ्याचप्रीत्यर्थ हे मागतो.

२० मी बोलत व प्रार्थना करीत असता, माझे पाप व माझे लोक इस्राएल ह्यांचे पाप कबूल करीत असता आणि माझ्या देवाच्या पवित्र पर्वतासाठी माझा देव परमेश्वर ह्याच्याकडे विनवणी करीत असता,

२१ असे प्रार्थनेचे शब्द मी बोलत असता जो पुरुष गब्रीएल, दृष्टान्ताच्या आरंभी मी अगदी व्याकूळ असता माझ्या दृष्टीस पडला होता, तो संध्याकाळच्या यज्ञसमयी माझ्यासमीप आला.

२२ त्याने माझ्याबरोबर भाषण करून मला समज दिली. तो म्हणाला, ञ्हे दानिएला, मी तुला बुद्धी देऊन चतुर करण्यासाठी आलो आहे.

देव कोण होता याविषयी तो बोलू लागला. परिस्थितीमध्ये तो देवाची इच्छा मुक्त करू लागला. लोकांनी त्यांच्या पापांची शिक्षा ७० वर्षे गुलामगिरीद्वारे भरल्याचे त्याला माहित होते. आता त्याने स्वातंत्र्याचा देव जो आपले वचन पाळतो आणि त्याची इच्छा या जगात पूर्ण होण्यासाठी लोकांना मुक्त करील अशा देवाचा सोध घेण्यासाठी त्याने स्वतः पुढाकार घेतला. देवाची दया मुक्त व्हावी यासाठी त्याने केवळ स्वतःसाठी नाही तर सर्व लोकांसाठी पश्चात्ताप केला.

त्याच्या प्रार्थनेचे उत्तर वाटेतच होते. आद्य देवदूत गॅब्रिएल यास ते उत्तर घेऊन पाठवण्यात आले. त्याच्या आयुष्यात देवाच्या इच्छेस कसे मुक्त करावे याचे कौशल्य शिकवण्यासाठी तो आला तसेच पित्याची योजना त्याच्या पिढीत पूर्ण होईल हे पहाण्यास आला. इस्राएलाच्या पुत्रांचे भविष्याचे प्रकटीकरण झालेला जुन्या करारातील तो एकमेव संदेष्टा होता. त्याने मसिहाचे आगमण, प्रत्येक मोठ्या राष्ट्राचे पतन, आणि अनोळखी जगताचे भविष्य पाहिले.

काय हे प्रकटीकरण! यिर्मया संदेष्ट्याच्या पुस्तकात वाचल्याप्रमाणे देवाची इच्छा मुक्त होण्याचा शोध घेतल्याने हे सुरू झाले.

तुम्हाला जीवंत वचनामध्ये काय आढळेल? तुमचे भवितव्य काय? तुम्ही जगाच्या वर्दळीत रुतलात का? जो देव अशक्य ते शक्य करू शकत नाही अशाची सेवा करता का? माझ्या बरोबर या व या जवळच्या प्रवासात देव आपल्या मंडळीस काय म्हणतो ते पाहा व ऐका.

# पाठ १

# पित्याचा दृष्टांत

या जगातील अल्प सेवाकार्यात येशूने जी एक गोष्ट केली तिची आठवण करण्याची गरज वाटत नाही :

योहान ५:१९-२०

१९ ह्यावरून येशूने त्यांना उत्तर दिले : मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, पुत्र **पित्याला जे काही करताना पाहतो** त्यावाचून काहीही त्याला स्वतः होऊन करता येत नाही; कारण जे काही तो करतो ते पुत्रही तसेच करतो.

२० कारण पिता पुत्रावर प्रीती करतो आणि स्वतः जे काही करतो ते सर्व त्याला दाखवतो. तुम्हांला आश्चर्य वाटावे म्हणून तो ह्याहून मोठी कामे त्याला दाखवील.

योहान ५:३०

मला स्वत: होऊन काही करता येत नाही; जसे मी ऐकतो तसा न्यायनिवाडा करतो; आणि माझा निवाडा यथार्थ आहे; कारण मी स्वतःच्या इच्छेप्रमाणे नव्हे **तर ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करायला पाहतो.**

पिता जे करतो तेच त्याने केले, आणि पित्याने सांगितले तेच फक्त तो बोलला.

ज्या काळात आपण राहात आहोत, त्यात भरपूर दृष्टांत असलेल्या मंडळ्या आहेत. देवाचे अद्‌भूत सेवक, सेविका आहेत. या सर्व गोष्टी ऐश्वर्यपूर्ण व योग्य आहेत. जगाला अशा सर्वांची गरज आहे.

तरीही आम्ही थांबून स्वतःला विचारायला हवे की देव काय करीत आहे? कोणत्याही प्रकारची सेवा अनेकांसाठी आशिर्वाद ठरते. आम्हाला माहीत आहे की देव प्रत्येकावर प्रेम करतो व जे आमच्या संपर्कात येतात त्यांना आम्ही प्रेम दाखवावे अशी त्याची इच्छा आहे. येथे वाद आहे. याचा अर्थ आम्ही जावून

आम्हाला उचित वाटते असे काही करावे का? आम्हाला ज्याची आवड वाटते असे करणाऱ्याशी जोडले जावे का? आम्हाला ठीक वाटते अशा मंडळीस, जेथे कार्यक्रम आहेत तेथे जावे का? की आणखी काही? भविष्यकाळातील घटनांची साखळी आम्ही भोवती आहे अशा काळात आम्ही राहात आहो. जेव्हा शेवट येईल तेव्हा येशूने सांगितलेल्या सर्व गोष्टी असतील किंवा आताच आहेत? आम्ही पहात नाही, किंवा ऐकत नाही असे काही आम्ही गमावित आहो का?

देव प्रेषितिय स्थापनेत मंडळीची पुर्नरचना करीत आहे. याचा अर्थ काय? याचा अर्थ पित्याच्या दृष्टांतात जाणे, त्याचे उद्देश, हेतू जाणणे व केवळ तो जे करतो तेच करणे काळ, समय पूर्ण होण्यापूर्वी, जगाच्या स्थापनेपूर्वी आम्हाला देवाने निवडले हे अद्‌भूत नाही का? त्याच्या दैवी इच्छेचा भाग होण्यासाठी त्याने आम्हाला निवडले.

इफिस. १:३-४

३ आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे;

४ त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले;

१:११

**११ आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवघे चालवतो त्याच्या योजनेप्रमाणे आम्ही पूर्वी नेमलेले असून** ख्रिस्ताच्या ठायी वतनदार झालो आहोत;

जसे त्याने इस्राएल राष्ट्र निवडून घेतले ज्याद्वारे त्याने आपले सामर्थ्य व गौरव प्रगट केले, तोच केवळ देव आहे हे जगाने ओळखावे म्हणून, तसेच त्याने आम्हाला निवडले आहे. आम्ही व इस्राएल राष्ट्रास देवाच्या योजनेत निश्चित भाग आहे.

म्हणून पिता काय करीत आहे? आज त्याचा हेतू काय? आमच्यासाठी त्याचा दृष्टांत काय? जेव्हा आम्ही त्याच्या स्वाधीन होतो तेव्हा त्याच्या इच्छा-आकांक्षा समजणे कठीण नसते. शास्त्रात वर्णन केलेल्या कार्यक्रमाद्वारे वचन आम्हाला दिशा दाखवते.

प्रकट. १९:६-९

६ तेव्हा 'जणू काय' मोठ्या 'समुदायाची वाणी, अनेक जलप्रवाहांचा ध्वनी' व प्रचंड मेघगर्जनांचा ध्वनी मी ऐकला; तो म्हणाला, '''हालेलूया; कारण' सर्वसमर्थ आमचा 'प्रभू' देव ह्याने 'राज्य हाती घेतले आहे.

७ आपण आनंद' व 'उल्लास करू' व त्याचा गौरव करू; **कारण कोकऱ्याचे लग्न निघाले आहे, आणि त्याच्या नवरीने स्वतःला सजवले आहे,**

८ तिला तेजस्वी व शुद्ध असे तागाचे तलम वस्त्र नेसायला दिले आहे;'' ते तागाचे तलम वस्त्र म्हणजे पवित्र जनांची नीतिकृत्ये आहेत.

९ तेव्हा तो मला म्हणाला, ''हे लिही की, कोकऱ्याच्या लग्नाच्या मेजवानीस बोलावलेले ते धन्य.'' तो मला असेही म्हणाला, ''ही देवाची सत्यवचने आहेत.''

पिता त्याच्या पुत्रासाठी वधू वेगळी करीत आहे. यहूदी संस्कृतीमध्ये मुलासाठी योग्य वधू शोधणे ही पित्याची जबाबदारी असे. अंतीम निर्णय त्याचा असे. कुटुंब त्याच्या हातात असे. तो वधूची निवड करी.

उत्पत्ती २४:१-४

१ अब्राहाम आता वृद्ध होऊन अगदी वयातीत झाला; परमेश्वराने अब्राहामाला सर्व बाबतीत शार्वीदित केले होते.

२ अब्राहामाच्या सर्वस्वाचा कारभार पाहणारा एक सर्वा जुना सेवक होता, त्याला त्याने म्हटले, ''तू आपला हात माझ्या मांडीखाली ठेव.''

३ मी तुला परमेश्वराची, आकाश पृथ्वी ह्यांच्या देवाची शपथ घेण्यास सांगतो

की ज्या कनानी लोकांत मी राहत आहे त्यांच्या मुलींपैकी कोणतीही नवरी माझ्या मुलासाठी तू पाहणार नाहीस.

४ तर माझ्या आप्तांकडे जाऊन तेथून माझा मुलगा इसहाक ह्याच्यासाठी नवरी पाहून आणशील.

मग त्याने अब्राहामाने सांगितल्याप्रमाणे केले. तो तिथे जाऊन पोहोंचल्यावर त्याने अशी प्रार्थना केली :
१२ आणि तो बोलला, ''हे परमेश्वरा, माझा धनी अब्राहाम ह्याच्या देवा, तू आज कृपा करून माझी कार्यसिद्धी कर; माझा धनी अब्राहाम ह्याच्यावर दया कर.

१३ पाहा, मी ह्या पाण्याच्या विहिरीपाशी उभा आहे, आणि गावातल्या कन्या पाणी भरायला बाहेर येत आहेत.

१४ तर असे घडून येऊ दे की ज्या मुलीला मी म्हणेन, मला पाणी पाजण्यासाठी आपली घागर उतर, आणि ती मला म्हणेल, तू पी आणि तुझ्या उंटांनाही मी पाजते, तीच तुझा सेवक इसहाक ह्याच्यासाठी तू नेमलेली असो; ह्यावरून मला कळेल की तू माझ्या धन्यावर दया केली आहेस.''

हे आपण अब्राहामाच्या बाबतीत पाहतो. त्याचा पुत्र इसहाकासाठी वधू कशी शोधावी याची निश्चित सूचना त्याने दिली. पुढे घडलेल्या घटना त्यास दुजोरा देतात. देवाने अशा स्त्रीस समोर आणले जी इसहाकाची पत्नी व्हावयाची होती. त्याने अशी वधू दिली जिच्या वंशात पुढे सर्व समर्थाच्या पुत्राचा जन्म व्हावयाचा होता.

प्रकटी. ९ च्या ७ व्या वचनाकडे निट लक्ष दिल्यास हे लक्षात येईल की वधूने स्वतःला तयार केले आहे. देवाने तिला तयार केले असे तिथे सांगितलेले नाही. आपण जसे व्हावे अशी पित्याची इच्छा आहे त्यासाठी पित्याचा दृष्टांत आहे. जेव्हा देव एखाद्याची निवड करतो, तेव्हा त्याने देवाची त्याच्याविषयी जी इच्छा आहे तिला समर्पित असावे. ह्याचा अर्थ असा नाही की आपल्याला काहीच

अधिकार नाही. येशूकडे नेहमीच निवड करण्याची संधी होती, एकतर तो देवाच्या इच्छेनुसार करू शकत होता किंवा ते करण्याचे नाकारू शकत होता.

योहान ८:२८-२९

२८ म्हणून येशूने त्यांना म्हटले, ''जेव्हा तुम्ही मनुष्याच्या पुत्राला उंच कराल तेव्हा तुम्हांला समजेल की तो मी आहे आणि मी आपण होऊन काही करत नाही तर मला पित्याने शिकवल्याप्रमाणे मी ह्या गोष्टी बोलतो.

२९ ज्याने मला पाठवले तो माझ्याबरोबर आहे; त्याने मला एकटे सोडले नाही, कारण जे त्याला आवडते ते मी सर्वदा करतो.''

देवाच्या स्वप्नामध्ये पतर जाऊन वधू होण्यापूर्वी आपण एक निवड केली पाहिजे - ती जीवन व मरण किंवा तारणाविषयीची नाही तर - आपल्यासाठी देवाने जी योजना आखून ठेवली आहे ती पूर्ण करणे. आपण त्या पाचारणाला समर्पित राहू का? ख्रिस्ताचे कार्य पूर्णपणे या पृथ्वीवर प्रकट करणारी पिढी आपण होणार आहोत का?

अनेकदा आपण देवाची इच्छा आणि त्याचा स्वभाव ह्यांमध्ये गफलत करतो. देव तर सदैव चांगलाच आहे. तो मुक्तीदाता आहे, आरोग्यदाता आहे, तो संपूर्ण जगाचा तारणारा आहे. पण हा त्याचा दृष्टांत नाही. ह्यासर्व गोष्टी त्याच्या राज्याची फळे आहेत. जिथे त्याचे राज्य आहे तिथे आरोग्य आहे, तिथे मुक्ती आहे आणि तिथे तारण आहे. पौल ही ह्याविषयी असे म्हणतो, ''जिथे देवाचा आत्मा आहे तिथे मोकळीक आहे.''

दृष्टांत म्हणजे जिथे तुम्हा चालला आहात, जिथे तुम्ही आहात त्याला दृष्टांत म्हणत नाही. पित्याचा दृष्टांत आहे की पुत्रासाठी वधू तयार करावी जी त्याच्यासोबत सर्वकाळासाठी राज्य करेल. हेच त्याचे कार्य आहे. स्वर्गारोहणापूर्वी येशूने त्याच्या शिष्यांना काय म्हटले त्याची आठवण करा :

प्रे.कृ. १:७

तो त्यांना म्हणाला, ''जे काळ व समय पित्याने स्वतःच्या अधिकारात ठेवले आहेत ते जाणणे तुमच्याकडे नाही.''

मग तो त्यांना म्हणाला, त्यांच्यावर सामर्थ्य उतरेल आणि ते साक्ष देतील, हे पेंटेकॉस्टच्या दिवशी झाले जो मंडळीचा जन्मदिवस होता. आणि त्यावेळचे संपूर्ण ज्ञान जग सुवार्ता ऐकत नाहीत तोपर्यंत त्यांनी हे कार्य चालू ठेवले.

पिता कोणत्या वेळेचे वाट पाहत आहे? तो विवाहाच्या वेळेची वाट पाहत आहे.

तर चला त्याचा दृष्टांत प्राप्त करूया. त्याचा दृष्टांत कृतीमध्ये नाही तर असण्यामध्ये आहे. जे होण्यासाठी देवाने आपल्याला बोलावले आहे तसे आपल्याला व्हायचे आहे. मग ज्या गोष्टी त्याला हव्या आहेत त्या घडून येतील.

जी ओळख आपली असावी अशी त्याची इच्छा आहे ती जेव्हा आपल्याकडे नसते, तेव्हा आपल्या कृत्यांद्वारे आपण इतरांना गोंधळात टाकतो. आपण काय करतो ह्याद्वारे आपली ओळख ठरत नाही, तर आपण त्याच्यामध्ये कोण आहोत ह्याद्वारे ठरते. जर आपण पहिल्या भागात योग्य असू तर ‘‘कृती’’ विभागामध्ये आपल्याला मर्यादा राहणार नाहीत.

जिथे कोठे आपण असू तिथे आपल्या जीवनाद्वारे देवराज्याची घोषणा होईल.

देवासोबत नातेसंबंध मिळवण्यासाठी जसे आपण त्याच्या विश्वासात त्याची मुले व मुली होण्याच्यामध्ये प्रवेश केला आहे, तसे आपण वधू म्हणून आपली जी ओळख आहे ती धारण केली पाहिजे. धार्मिक कार्यांद्वारे नाही तर त्याच्यासोबतच्या घनिष्ठ नातेसंबंधाद्वारे स्वतःला तयार करणे ही आपली जबाबदारी आहे.

# पाठ 3

## दृष्टीकोन - तुम्हाला काय दिसते?

पित्याविषयी तुमचा जो दृष्टीकोन आहे त्यावर तुम्ही कसे जीवन जगता, तुम्ही कशी प्रार्थना करता आणि तुम्ही कसे विचार करता हे ठरते.

मंडळीच्या इतिहासामध्ये तुम्हाला अनेक मजेशीर गोष्टी पाहायला मिळतील. महान सामर्थ्याद्वारे मंडळीची सुरूवात झाली हे आपल्याला ठाऊक आहे. प्रत्यक्ष पवित्र आत्मा मनुष्यांवर उतरून आला. पेंटेकॉस्टच्या दिवशी पेत्र काय म्हणाला ते लक्षात घ्या :

प्रे.कृ. २:१७

१७ ‘देव म्हणतो, शेवटल्या दिवसांत असे होईल की, मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन; तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या तरुणांना दृष्टान्त होतील, व तुमच्या वृद्धांना स्वप्ने पडतील;

जरी संपूर्ण मनुष्यमात्रांवर त्याचा वर्षाव करण्यात आला तरी सर्वांनाच तो प्राप्त झाला नाही. पिता जे काही करीत होता त्यामध्ये सर्वांनाच सहभाग मिळाला नाही. येशूने म्हटले की, पवित्र आत्मा दान आहे; आणि दानाद्वारे तुमचे जीवन बदलल्यापुर्वी तुम्ही ते स्वीकारणे आवश्यक असते.

देवाविषयीचा दृष्टीकोन ठरवण्याचे अनेक मार्ग आहेत. खऱ्या अर्थाने आपण त्याच्याकडे ज्या दृष्टीने पाहतो त्याद्वारे आपल्या जीवनाचे सर्व मर्यादा ठरतात. आपल्या जीवनाच्या मर्यादा, शक्यता, दृष्टांत आणि उद्देश काय असेल? चला तर असे तीन दृष्टीकोन पाहूया.

**न्याय करणारा देव**

देवाकडे तुम्ही कोणत्या दृष्टीने पाहता? देवाविषयी अनेक गोष्टी सत्य आहेत. त्याची उदाहरणे आपण पवित्र शास्त्रात पाहतो की, अनेक देशांवर देवाच्या

न्यायाचा हात पडला.

उत्पत्ती ६:१३
१३ मग देव नोहाला म्हणाला, ''सर्व प्राण्यांचा अंत करण्याचे माझ्या मनात आले आहे, कारण त्यांच्यामुळे पृथ्वीवर जाचजुलूम माजला आहे. पाहा, मी पृथ्वीसह त्यांचा नाश करीन.

निर्गम १२:१२
१२ कारण ह्या रात्री मिसर देशात फिरून त्यातील मनुष्य व पशू ह्या सर्वांचे प्रथमजन्मलेले मी मारून टाकीन आणि मिसर देशातील सर्व देवांचे शासन करीन; मी परमेश्वर आहे.

देव पवित्र आणि न्यायी आहे, आणि त्याचे हे पावित्र्य आणि न्यायित्त्व अधार्मिकतेवर न्याय आणते. फक्त तोच योग्य आणि खरा न्याय देऊ शकतो, कारण केवळ तोच पूर्णपणे न्यायी आहे. खऱ्या सत्याच्या आधाराविना तो कधीच कोणताही न्याय करीत नाही. आपण काय केले हेच केवळ त्याना माहित नाही, तर त्याच्या सर्वज्ञानी सामर्थ्यामुळे आपण पुढे काय करणार आहोत हे ही त्याला कळते.

इब्री. १२:२९

१९ कारण आपला देव भस्म करणारा अग्नी आहे

तो भस्म करणारा अग्नी आहे. तो न्याय करणारा देव आहे. ह्या गोष्टी सत्य आहेत. जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा देव ह्या जगाचा न्याय करील.

जर ह्या सत्यांवर आपण देवाविषयीचा आपला दृष्टीकोन आणि नातेसंबंध प्रस्थापित ठेवले तर आपल्या जीवनात अनेक मर्यादा येतील. आपण योग्य आणि पवित्रपणे प्रार्थना करू लागू. स्वतःला आपण पापी समजू ज्याला देवापासू काही मिळवण्याचा अधिकार नाही. जेव्हा कोणी तरी आपल्याला सांगते की देव आपल्यावर प्रीती करतो, तेव्हा देवाने त्याच्या पुत्राला या जगात

पाठवले, त्याने आपली पापे स्वतःवर घेतली आणि त्याद्वारे आपल्याला स्वर्गात जाण्याचा मार्ग तयार केला ह्या गोष्टींशिवाय आपल्याला अधिक काही लक्षात येत नाही.

आपल्या मनात भिती असेल आणि अशी भिती बाळगूनच आपण देवाकडे जाऊ शकतो असे वाटू लागेल. देव पवित्र आणि न्यायी आहे त्यामुळे येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर ज्या सर्व गोष्टी आपल्यासाठी मुक्त केल्या त्यामध्ये आपण प्रवेश करू शकत नाही. देवाची आपल्यासाठी काही योजना आणि ठिकाण नेमले आहे हे आपल्याला कधी समजणार नाही आणि त्यामध्ये प्रवेश करू शकणार नाही.

देव जे करतो त्यापेक्षा अधिक तो कोण आहे हे आपण पाहिले पाहिजे. आपण नवीन करारामध्ये आहोत, देवाच्या कुटुंबामध्ये आपल्याला बोलावण्यात आले आहे. नवीन जन्म, आत्म्याच्याद्वारे मिळालेला नवीन जन्म, कुटुंबामध्ये प्रवेश, अंधःकाराच्या राज्यातून प्रकाशाया राज्यात प्रवेश आणि ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये बाप्तिस्मा होणे अशा प्रकारे आपल्या नातेसंबंधाची सुरूवात होते. आपल्याला नवीन ओळख मिळाली आहे. पूर्वेपासू पश्चिम जशी दूर आहे, तसे देवाने आपले पाप आपल्यापासून दूर केले आहेत. म्हणून धार्मिकतेचे जीवन जगणे थांबवा आणि आपण कोण आहोत हे समजून जीवन जगू लागा.

### देव आपल्या पिता

जुन्या करारामध्ये देवाने इस्राएल लोकांची निवड केली अशासाठी की त्यांच्याद्वारे त्याचे सामर्थ्य आणि गौरव संपूर्ण जगाला प्रकट करावे. त्यांना देवाचे लोक म्हणण्यात आले.

निर्गम १९:६
६ पण तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र व्हाल. हेच शब्द तू इस्राएल लोकांना सांग.''

२ शमु. ७:२३

२३ तुझ्या इस्राएल प्रजेसमान भूतलावर दुसरे कोणते तरी राष्ट्र आहे काय? आपली प्रजा करून घेण्यासाठी इस्राएलास सोडवण्यास तू गेलास, आपले नाव केलेस, त्यांच्यासाठी महत्कृत्ये केलीस, आपल्या लोकांना मिसर देशातून इतर राष्ट्रांच्या व देवांच्या हातांतून सोडवून घेतले आणि त्यांच्यादेखत आपल्या देशासाठी भयानक कृत्ये केलीस; असे करायला कोणत्या राष्ट्राचा देव गेला होता?

त्यांना कधीही ''त्याची मुले'' किंवा ''देवाचे कुटुंब'' म्हणण्यात आले नाही. पण नवीन करारामध्ये सर्व बदलून गेले. जेव्हा येशू आला तेव्हा तो अब्राहामाची मुले ह्याविषयी नाही तर देवाची मुले ह्याविषयी बोलू लागला, कारण त्याकाळी परुशी लोकांना अब्राहामाची मुले हा संज्ञा परिचीत होती. परंतु देवाची मुले म्हणवून घेणे हे त्यांच्यादृष्टीने गुन्हा होता.

मत्तय ५:९

९ जे शांती करणारे ते धन्य, कारण त्यांना देवाची मुले म्हणतील.

ह्याठिकाणी येशूने स्वतःला प्रथम देवाचा पुत्र म्हणून संबोधले.

हा नवीन विचार त्या संस्कृतीला पचला नाही. परुशी आणि लोकांनी जो देव पाहिलो तो न्याय करणारा देव होता. पण येशू ज्या देवाविषयी सांगत होता तो तर पिता होता.

योहान १:१२-१३

१२ परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला;

१३ त्यांचा जन्म रक्त, अथवा देहाची इच्छा, अथवा मनुष्याची इच्छा ह्यांपासून झाला नाही; तर देवापासून झाला.

आता आपल्याला स्पष्टपणे समजते की आपण फक्त त्याचे राष्ट्र किंवा लोक नाही तर त्याचे पुत्र व कन्या असून त्याच्या कुटुंबाचे घटक आहोत.

एखाद्या कुटुंबाचे सभासद होण्यासाठी तुम्हाला त्या कुटुंबात जन्मावे लागते. जसे आपल्या पृथ्वीवरील कुटुंबामध्ये आपला जन्म झाला तसेच देवाच्या कुटुंबाचे सभासद होण्यासाठी आपल्याला नवीन जन्म घेण्याची गरज आहे.

योहान ३ः३

३ येशू त्याला म्हणाला, ''मी तुम्हांला खचीत सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही.''

योहान ३ः६-७

६ देहापासून जन्मलेले देह आहेत आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहेत.

७ 'तुम्हांला नव्याने जन्मले पाहिजे' असे मी तुम्हांला सांगितले म्हणून आश्चर्य मानू नका.

आपला प्रथम जन्म हा देहामध्ये नैसर्गिकरित्या झाला. पण दुसरा जन्म हा आध्यात्मिक आहे, त्यामध्ये आपल्या आत्म्याचा ख्रिस्तामध्ये त्याच्या समानतेत सार्वकालिकरित्या जन्म होतो. आपला नैसर्गिक जन्म हा आपल्या जगीक पित्याच्या फळाचे फळीत आहे. पण दुसरा जन्म हा देवाचे फळ म्हणजे त्याचे वचन ह्यामुळे होतो.

१ पेत्र १ः२३-२४

२३ कारण तुम्ही नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे 'देवाच्या जिवंत व टिकणाऱ्या' शब्दाच्या द्वारे पुन्हा जन्म पावलेले आहात.

२४ कारण ''सर्व मानवजाती गवतासारखी आहे; आणि तिचा सर्व गौरव गवताच्या फुलासारखा आहे. गवत वाळते व त्याचे फूल गळते.

एकादृष्टीने आपण येशूपेक्षा वेगळे नाही, नवीन जन्माद्वारे आपल्याला दत्तक घेण्यात आले आहे. आपल्यामध्ये त्याचा आत्मा आहे आणि जे काही आपल्याला मिळेल असे येशूने सांगितले ते सर्व आपल्याला मिळेल. हे लक्षात

ठेवणे फार आवश्यक आहे की, येशू हाच देवाचा एकुलता एक पुत्र आहे. देवाने येशूला आपल्यासाठी मरण्यासाठी पाठवले तेव्हा त्याच्याकडे दुसरा पुत्र किंवा कन्या नव्हत्या. ह्याचा अर्थ असा नाही की येशू काही बाबतीत देव पित्यापेक्षा कनिष्ठ झाला. पण जेव्हा तो मनुष्य बनला, तेव्हा सर्व बाबतीत त्याने पित्याला समर्पित होण्याचे ठरवले. ज्यादिवशी मरियेच्या पोटी चमत्कारीकरित्या त्याची गर्भधारणा झाली तेव्हाही तो एकुलता एकच होता.

रोम. ८:१५-१६

१५ कारण पुन्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला नाही; तर ज्याच्या योगे आपण ''अब्बा! बापा!'' अशी हाक मारतो असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला आहे.

१६ तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत;

२ करिंथ. ६:१८

१८ आणि मी तुम्हांला 'पिता असा होईन,' तुम्ही 'मला पुत्र' व कन्या असे व्हाल, 'असे सर्वसमर्थ प्रभू म्हणतो.''

गलती. ४:४-७

४ परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता.

५ ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा.

६ तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने ''अब्बा! बापा!'' अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंतःकरणात पाठवले आहे.

७ म्हणून **तू आतापासून गुलाम नाहीस तर पुत्र आहेस; आणि पुत्र आहेस तर देवाच्या द्वारे वारसही आहेस.**

स्वतःच्या पुत्राला पाठवण्याच्याद्वारे देवाने त्याची किती अद्‌भूत प्रीती प्रकट केली.

तुम्ही स्वतःला देवाची मुले समजता का? तुम्ही स्वतःला त्याचा मुलगा किंवा मुलगी म्हणून पाहता का? सर्वजण मनुष्य आहे म्हणून ते देवाची मुले आहेत असे सर्वांनाच म्हणावेसे वाटते. पण हे खरी गोष्ट ही नाही. कदाचीत ते सर्व आदामाची मुले असतील पण देवाची नाही. त्याच्या कुटुंबाचे सदस्य होण्याचा केवळ एकच मार्ग आहे, आणि तो येशूद्वारे आहे.

राष्ट्राचे नागरिक असल्याने तुम्हाला मुल म्हणून तुम्हाला अनेक हक्क मिळाले असतील. इतरांना नसेल पण मूल म्हणून पित्याकडे जाण्याचा अधिकार असेल.

नागरी युद्धातील एका सैनिकाची गोष्ट मला फार आवडते. अध्यक्ष लिंकन ह्यांना देण्यासाठी त्याच्याकडे बातम्या होत्या. व्हाइट हाऊस कडे पोहोंचल्यानंतर त्यांना भेटण्याचा त्याने फार प्रयत्न केला. परंतु त्या प्रत्येक वेळी तो अपयसी ठरला. आणि त्याला सांगण्यात आले की त्यांना भेटण्याची पूर्वसुचना द्यावी लागते. निराश, हताश होऊन तो शेजारच्या उद्यानात गेला व डोक्याला हात लावून बसला. एका तरुणाने त्याला पाहिले व त्याची निराशा ओळखली व त्याचे कारण त्याला विचारले. मग युद्धभुमीतून अध्यक्षांसाठी घास निरोप असून तो सांगण्यासाठी त्याला आत प्रवेश मिळत नाही असे त्याने सांगितले. त्या तरुणाने त्याला सांगितले की तो त्याला आत घेऊन जाईल. मग त्याने व्हाइट हाऊसच्या मागच्या दाराने सैनिकाला त्याला आत नेले. तो सरळ अध्यक्षांच्या कार्यालयात गेला. लिंकन कामात व्यस्त असूनही त्याने विचारले, ''बाळा, तुला काय हवे आहे?'' तरुणाने सांगितले या सैनिकास आपल्याशी बोलायचे आहे.

पुत्र, कन्या असण्याचे फादे आहेत. हे या गोष्टीवरून दिसते. जेव्हा आम्ही लेकरे असतो तेव्हा दृष्टीकोन पूर्ण वेगळा असतो. काहींची नोकरी अशी असते की त्यांना फार कडक व कठोर राहावे लागते. किंवा काहींना जगावर परिणाम होतील असे निर्णय घ्यावे लागतात. वेगळ्या प्रकाशात आम्ही ते ओळखतो.

काही कामाशिवाय एखाद्याशी आम्ही संपर्क साधू शकत नाही. पण अनेक

लोक देवाकडे अशाच प्रकारे जातात. तो त्यांचा पिता आहे ह्या भावनेने ते त्याच्याकडे जात नाहीत. तर जो सर्व शक्तीमान, अती पवित्र, सर्वज्ञानी, सर्व सृष्टीवर ज्याची सत्ता आहे अशा देवाकडे जातात. त्यांना त्याच्याकडे फार महत्त्वाचे काम आहे अशा थाटात ते त्याच्याकडे जातात.

देव या सर्व गोष्टी जाणतो, आणि आपण त्याच्या विशेष उपाधींमुळे  नव्हे तर आपला पिता म्हणून त्याच्याकडे जावे असे त्याची इच्छा आहे.

तो असा आहे. प्रेमळ पिता, जो आपल्या मुलांची काळजी घेतो. आमच्या जगीक पित्याशी असे करु शकत नाही. मग आमच्या स्वर्गीय पित्याशी का करावे? जे स्वातंत्र्य पित्याने तुम्हाला दिले त्यात राहा. याचा अर्थ असा नाही की आम्ही पवित्र जीवन जगावे असे पित्याला वाटत नाही. पावित्र्य हे पहिले व प्राथमिक वेगळेपण देवामध्ये आहे. काहीतरी पवित्र म्हणजे काहीतरी त्याला समर्पित केलेले, त्याच्या सान्निध्यात राहणे. तुम्ही आपला समय कोणाबरोबर कसा घालवता त्यानुसार तुम्ही होता. जे ग्रहण केले त्याचे परावर्तन करा. जर तो स्वर्गाचा घटक असेल तर त्याचेच उत्सर्जन होइल. जर आकाशवाणी खडक किंवा भौतिक असेल तर त्याचेच उत्सर्जन कराल. जर स्वर्गीय पिता तुमचा पिता असेल तर तुम्हाकडून पावित्र्य, जीवन आणि राज्य याचेच उत्सर्जन होईल. तुमचा स्वाभिमान मुक्त करणे असेल. काहीतरी झालेले, खोटे धार्मिक स्थिती असलेले तुम्ही नसाल.

देवाला तुम्ही तुमचा पिता मानता का? पित्याची प्रीती तुम्ही अनुभवली आहे का? त्याच्या सिंहासनासमोर तुम्ही धैर्याने येशू शकता का? कारण तिथे असण्याचा अधिकार तुम्हाला आहेच व पित्याच्या सान्निध्यात तुमचे नेहमीच स्वागत आहे.

देवाच्या प्रीतीपासून तुम्हाला विभक्त करणारी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे तुमची इच्छा.

येशूने शास्त्र परुशांना सांगितलेल्या उधळ्या पुत्राच्या दाखल्यावरून हे स्पष्ट होते. ते कुरकुर करीत होते की येशू पापी लोकांमध्ये राहतो, त्यांच्याबरोबर जेवतो. म्हणून मग येशूने दोन पुत्रांची गोष्ट सांगितली. एकाने संपत्तीत

आपला वाटा घेतला व दूर जाऊन तो ख्यालीखुशालीत उडवून टाकला. दुसरा नेहमी आपल्या घरी राहिला व त्याने स्वतःच्या हिश्शाचा कधीच विचार केला नाही. नेहमी त्याने सर्व पित्याच्या इच्छेप्रमाणेच केले. पित्याच्या दृष्टीने ते दोघेही चुकीचे वागले, पहिल्याला काही नाते न ठेवता फक्त संपत्ती हवी होती. दुसरा आज्ञाधारक व विश्वासू राहिला पण आपल्या पित्याच्या मालमत्तेचा उपभोग घेण्याचे त्याला धैर्य नव्हते. त्याच्या अपेक्षापेक्षा वेगळी ओळख पित्याने त्याला करून दिली. धाकट्या मुलाची घरात पुन्हा सामावुन घेण्यात आले तेव्हा त्याने पूर्ण अंतःकरणाने पश्चात्ताप केला. मोठ्या भावाचे हृदय कधीच वळे नाही, आणि हरवलेल्या पुत्राला पुन्हा मिळवल्यावर आपला बाप इतका आनंदी का आहे हे त्याला कळले नाही. त्याच्या भावाला मिळाला तसाच आपल्याला मिळावा अशीच त्याची इच्छा होती. त्याला केवळ न्याय हवा होता जो त्याला दाखवला गेला नाही व पित्याच्या प्रीतीची जी करुणा तिचा उपभोग घेतला नाही.

पुत्र म्हणून देव आमचा पिता म्हणून जगताना काही मर्यादेपर्यंत विचार करण्याचा आमचा स्वभाव अजूनही आहे. जेव्हा आमचे पतन होते तेव्हा आम्ही दंडाखाली राहतो व देवाच्या प्रेमाला पारखे होते. देवाशी आमचा जसा संबंध हवा तसा आम्ही तो ठेवत नाही व आमची आध्यात्मिक वाढ खुंटते. आम्हाला माहित आहे की जेव्हा आम्ही पश्चात्ताप करतो तेव्हा देव आम्हाला स्वीकारतो आणि खरेच तो तसे करतो. पण आपण एका आत्मिक चक्रामध्ये अडकून पडतो आणि त्यातून बाहेर पडत नाही.

देव पिता जे करतो त्यास आम्ही जडून राहीले पाहिजे हे आम्ही जाणतो पण आम्हाला ते कमीपणो वाटते व त्या आनंदाला आम्ही मुकतो. आमच्या प्रार्थना प्रामाणिक आहेत, ज्यामध्ये पित्याविषयी पूर्ण आदर व कृतज्ञता असते. आमची प्रगती होते, पिता आम्हावर प्रेम करतो हे कळते पण राज्याविषयी कळकळ वाटत नाही. येशूपण आमच्याद्वारे त्याचे जीवन मुक्त होऊ देवू शकत नाही.

**देव वर आहे**

देव वर आहे असा तिसरा दृष्टीकोन आता आपण पाहूया.

तुम्ही कधी कोणाच्या प्रेमात पडलात का? असेल तर त्या व्यक्तीप्रतीच्या सर्व भावना उफाळून येऊन प्रेम व्यक्त करण्याचे प्रयत्न, कल्पना केल्या असतील.. हे सर्व किती छान वाटते. आम्हाला वाटू लागते की आम्ही ढगावर राहत आहोत आणि देवदूत वीणा वाजवून मधून प्रेमगीत गात आहेत.

होय! जेव्ह आम्ही प्रेमात पडतो तेव्हा नक्कीच काहीतरी बदलते. जीवनाची व्याख्या बदलते. आम्हाला महत्त्वाची वाटणाऱ्या व्यक्तीविषयीची भावना, व्याख्या बदलते. जे करण्यासाठी वेळ खर्च करतो ते सर्वांना सांगावेसे वाटते. आता एक क्षण थांबा, मी येशूविषयी बोलत आहे. तो आमच्या आत्म्यांचा प्रेमी आहे; तो वर आहे आणि तो येत आहे.

इफिस. ५:२५-३२

२५ पतींनो, जशी ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली तशी तुम्हीही आपापल्या पत्नीवर प्रीती करा; ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली आणि स्वतःस तिच्यासाठी समर्पण केले,

२६ अशासाठी की, तिला त्याने वचनाद्वारे जलस्नानाने स्वच्छ करून पवित्र करावे,

२७ आणि गौरवयुक्त मंडळी अशी ती स्वतःला सादर करावी, म्हणजे तिला डाग, सुरकुती किंवा अशासारखे काही नसून ती पवित्र व निर्दोष असावी.

२८ त्याचप्रमाणे पतींनी आपापली पत्नी आपलेच शरीर आहे असे समजून तिच्यावर प्रीती करावी. जो आपल्या पत्नीवर प्रीती करतो तो स्वतःवरच प्रीती करतो.
२९ कोणी कधी आपल्या देहाचा द्वेष केलेला नाही; तर तो त्याचे पालनपोषण करतो; जसे ख्रिस्तही मंडळीचे पालनपोषण करतो तसे तो करतो.
३० कारण आपण ख्रिस्ताच्या शरीराचे अवयव आहोत.
३१ ‘‘म्हणून पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या पत्नीला जडून राहील; आणि ती उभयता एकदेह होतील.’’
३२ हे रहस्य मोठे आहे, पण मी ख्रिस्त व मंडळी ह्यांच्यासंबंधाने बोलतो आहे.

ही वचने मंडळी व येशू विषयीची आहेत. ती पवित्र वधूविषयीची आहेत.

आमच्याशी ऐक्य करण्यासाठी त्याने आपल्या पित्याला त्यागले. विवाहाच्या कराराद्वारे आम्ही त्याच्याशी एकदेह होऊन शरीराचे भाग झालो आहोत. आम्ही त्याची वधू आहोत. त्याविषयी थोडावेळ विचार करा. तुम्ही तुमच्या वधूशी कसे नाते ठेवाल? कोणत्या प्रकारचा नातेसंबंध असेल? तुमचा दृष्टीकोन कसा बदलेल?

अजून आम्ही त्याच्याशी विवाहबद्द झालेलो नाही. होय ना? आमचा लग्नसोहळा झाला नाही. हे सर्व सत्य आहे हे मी जाणतो. तसे असले तरी देव जे करतो ते पाहण्यास आम्ही शिकावे.

देव वेळ, मर्यादेबाहेर राहतो. यामुळे तो अडत नाही. तो आरंभ व शेवट एकदाच पाहतो.

प्रकटी. १३:८

८ 'ज्या कोणाची' नावे जगाच्या स्थापनेपासून 'वधलेल्या कोकऱ्याजवळील जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली' नाहीत असे पृथ्वीवर राहणारे सर्व जण त्या श्वापदाला नमन करतील.

इफिस. १:४

४ त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले;

इब्री. ४:३

३ त्याची 'कृत्ये' जगाच्या स्थापनेपासून समाप्त झाली. तथापि, ''त्याप्रमाणे मी रागाने शपथ वाहून म्हणालो, 'हे माझ्या विसाव्यात निश्चित येणार नाहीत;''' असे ज्या 'विसाव्याविषयी,' त्याने सांगितलेले आहे त्यात, ज्या आपण विश्वास ठेवला आहे ते 'आपण प्रवेश करत आहोत;'

ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्षात घडल्या नसल्या तरी देव त्या सर्व पूर्ण झाल्याचे पाहतो. आत्मा हा एक घटक आहे त्यामुळे हे शक्य होते. त्यास विश्वास असे म्हणतात. देवामधील आपले प्रतिफळ इतके निश्चित आहे की जणू ते

अगोदरच मिळालेले आहे.

देवाने जे घडले आहे असे सांगितले आहे त्यामध्ये चालण्यास आम्ही शिकले पाहिजे. ती क्षमता देवाने आपल्याला दिलेली आहे. त्यासाठीच देवाने आपल्याला बोलावलेले आहे. आपल्या दैहीक आकलन क्षमतेने आध्यात्मिक गोष्टी समजून घेण्याचे आपण थांबवले पाहिजे. ज्या आध्यात्मिक गोष्टी देवाने जाहिर केल्या आहेत त्याविषयी पुन्हा विचार करण्यास देवाचे वचन आपल्याला सांगते. हे म्हणजे वचनाच्याद्वारे जलस्नान करण्यासारखे आहे. प्रत्यक्षात त्याद्वारे आपले दैहिक विचार त्याद्वारे धुतले जातात आणि आपले मन आत्मिक गोष्टींसाठी तयार होते. न पाहिलेल्या सत्यामध्ये चालण्याची कुवत त्याद्वारे आपल्याला मिळते.

२ करिंथ मध्ये पौल म्हणतो :

२ करिंथ. ४:१७-१८

१७ कारण आमच्यावर येणारे तात्कालिक व हलके संकट हे आमच्यासाठी अत्यंत मोठ्या प्रमाणात सार्वकालिक गौरवाचा भार उत्पन्न करते;

१८ आम्ही दृश्य गोष्टींकडे नाही तर अदृश्य गोष्टींकडे लक्ष लावतो; कारण दृश्य गोष्टी क्षणिक आहेत, पण अदृश्य गोष्टी सार्वकालिक आहेत.

देव वचने पुष्कळ सार्वकालिक वास्तवतेने भरलेली आहेत आणि त्यात राहण्यासाठी आम्हाला पाचारम केलेले आहे. पित्याने आम्हाला सार्वकालिक राज्या पाहण्यासाठी पात्र बनवले आहे. त्याच्या सार्वकालिक योजनेनुसार राहण्यास तो बोलावीत आहे; व त्याच्या वधूला या जगात ठेवले आहे यासाठी की त्याने येवून तिला घरी स्वगृही न्यावे

आम्ही त्याची वधू आहो. असे जर आम्ही ओळखले तर आमचे जीवन कसे बदलेल? याचा तुमच्या दृष्टीने अर्थ काय? ज्याने सर्व निर्माण केले त्या देवाकडून तुमचा पाठलाग होतो का? तुम्ही त्याचे पुरस्कृत लोक आहात. तुम्हीच ते आहा ज्याने सर्व तुमच्यासाठी घडवले; त्याचे प्रेम तुम्हावर आहे हे

दाखवणारे तुम्हीच ते आहा. हळूवारपणे शुद्ध करून पवित्र केले जाणारे, शुद्धीकरण, गौरव करणारे तुम्हीच ते लोक आहा. तुम्ही त्याच्या जीवनाची प्रीती आहा ज्याला तुमच्याशी घनिष्ठ नातेसंबंध ठेवायचे आहेत. ह्या गोष्टींवर आपण विश्वास ठेवला तर आपण त्याला कसे सामोरे जाऊ? आपले प्रार्थनामय जीवन कसे असेल? जेव्हा आपण सत्याला स्वीकारू तेव्हा कोणते पातक आपल्यावर अधिकार चालवू शकेल?

कदाचीत आम्ही त्याला आवडणाऱ्या गोष्टींवर प्रेम करू लागू. देवाविषयीच्या या तीन दृष्टीकोनांमध्ये आणि विशेषतः प्रथम दोन दृष्टीकोनांमध्ये अनेक ख्रिस्ती लोक जगतात. अशा आध्यात्मिक चक्रामध्ये आपण राहतो ज्यामध्ये आपण गोल गोल फिरत राहतो. पहिल्या दोन मधून आपल्याला सुटका मिळत नाही. ते कृतीवर आधारीत आहेत. देव जर न्यायाधीश आहे तर आपण नेहमीच पापी असू. स्वर्गातील ज्या गोष्टी आपल्याला मुक्त करतात त्या आपण कधीच प्राप्त करू शकत नाही. आपले जीवन अशे बनते जिथे आपण, ''ज्या ठिकाणी आपण कधीही पोहंचू शकत नाही तिथे जाण्याचा खूप प्रयत्न करतो, पश्चात्ताप करतो पण पुन्हा त्याच चक्रामध्ये अडकतो.''

दुसरा दृष्टीकोन जरा बरा आहे, पण त्यामध्येही अदृश्य अट आहे ज्यानुसार आपण कधी जगू शकत नाही. मग पुन्हा आपण अनेक प्रयत्न करूनही शेवटी अपयशीच ठरतो. होय, आमचा ठाम विश्वास आहे की येशूने जे केले ते आमच्यासाठीच केले, पण त्या राज्यात प्रवेश करण्याइतका विश्वास आम्ही कधी निर्माण करू शकत नाही. आमच्या पित्याच्या सर्व सुविधा आमच्यासाठी आहेत की नाही याची आम्हाला खात्री वाटत नाही.

केवळ तिसरा दृष्टीकोन असा आहे जो आपल्याला पित्याच्या इच्छेप्रमाणे असणारी, देवाच्या महान प्रीतीत व सत्यामध्ये जीवन जगण्याची मोकळीक देते. आपण निवडलेले आहोत, त्याच्या उद्देशपूर्तीसाठी आपल्याला पाचारण झालेले आहे, आपण अशी वधू असू जिला तो प्राप्त करू इच्छित आहे.

जेव्हा आपण आपल्या स्वतःला देवाच्या दृष्टीकोनातून पाहतो, तेव्हा पित्याने दिलेल्या सर्व आत्मिक क्षमता आपण खुल्या करतो. भीती आणि शंकाची सर्व

अडखळणे आपण मोडून टाकतो आणि सार्वकालिक ठिकाणामध्ये आपण प्रवेश करतो.

२ तीमथ्य. १:८-९

८ म्हणून आपल्या प्रभूविषयीच्या साक्षीची आणि मी जो त्याचा बंदिवान त्या माझी तू लाज धरू नयेस; तर देवाच्या सामर्थ्याच्या परिमाणाने सुवार्तेसाठी माझ्याबरोबर दु:ख सोसावे.

९ त्याने आमच्या कृत्यांप्रमाणे नव्हे तर स्वत:च्या संकल्पाप्रमाणे व कृपेप्रमाणे आम्हांला तारले व पवित्र पाचारणाने पाचारले आहे; ही कृपा युगांच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायी आपल्यावर करण्यात आली होती;

# पाठ ४

## विश्वास, आशा आणि प्रीती

ज्या ध्येयाप्रत जाऊन आम्हाला स्थिर व्हायचे आहे त्याकडे आम्ही कशी वाटचाल करतो? पित्याने ज्यासाठी आम्हाला पाचारण केले आहे तसे आम्ही कसे होतो? त्याचे उद्देश व पाठपुरावा ह्यांना आमचा ताबा कसा घेवू देतो? एक मार्ग आहे. आमच्या जीवनात देवाचे राज्य मुक्त करण्यास पवित्र आत्म्यास अनुमती देणे.

१ करिंथ मध्ये पौल पवित्र आत्म्याचे मार्ग कसे शिकवतो ते पाहू या :

१ करिंथ. १२:१

बंधुजनहो, तुम्ही आध्यात्मिक दानांविषयी अजाण असावे अशी माझी इच्छा नाही.

ह्या वचनातील दान हा शब्द तिरप्या अक्षरात आहे, ह्याचा अर्थ त्याचा मुख्य अर्थ निट समजून घेतला पाहिजे. संपूर्ण शास्त्रभागावर आधारीत हा शब्द निट समजून घेतला पाहिजे. ''आध्यात्मिक'' ह्या शब्दासाठी ''न्युमॅटिकोस'' हा शब्द आहे, ज्याचा अर्थ अलौकिक, अदृष्य सामर्थ्य. हा शब्द इंग्रजीच्या सेप्ट्यएजंट किंवा शुभवर्तामानांमध्ये आठळत नाही; हा पेंटेकॉस्टच्या नंतरचा शब्द आहे.

ह्या शब्दाचा पूर्ण अर्थ आहे : ''गोष्टी वेगळ्या करणे आणि आत्म्याचा उपयोग करणे.'' पवित्र आत्मा आपल्यामध्ये कसे कार्य करतो हे ह्यावरून स्पष्ट होते.

पौल हा अध्याय पुढील वचनांने संपवतो :

श्रेष्ठ कृपादानांची उत्कंठा बाळगा. शिवाय एक सर्वोत्कृष्ट मार्ग मी दाखवतो.

देव पित्याची प्रीती प्रकट करण्यासाठी आपण त्याने दिलेली दाने उपयोगात आणावी असे पौल आपल्याला उत्तेजन देतो.

ह्याच अध्यायात पौल पुढे पवित्र आत्मा, तो कसे कार्य करतो, कसे मार्गदर्शन करतो, आणि शरीराची रचना आणि कार्यपद्धती कशी असते ह्याविषयी सांगतो. पुढे जाऊन तो पवित्र शास्त्रातील सर्वात सुपरिचीत शास्त्रभाग लिहतो - त्याला अनेकदा प्रीतीचा अध्याय असेही संबोधले जाते, अनेक विवाहांमध्ये त्यावर संदेश दिले जातात, आणि पवित्र शास्त्रातील प्रीतीचे सर्वोत्तम स्पष्टीकरण म्हणून त्याचा आदर केला जातो. पुढील वचनांद्वारे तो या शास्त्रभागाचा शेवट करतो :

१ करिंथ. १३:१३

१३ सारांश, विश्वास, आशा, प्रीती ही तिन्ही टिकणारी आहेत; परंतु त्यांत प्रीती श्रेष्ठ आहे.

विश्वास, आशा आणि प्रीती ह्या देवराज्याचे प्रमुख सामर्थ्य आहे, ह्याद्वारे पिता आपल्यामध्ये आणि आपल्याद्वारे त्याचे राज्य प्रकट करतो.

ह्या तीन्ही गोष्टी एकमेकांत गुंफलेल्या आहेत. एका शिवाय इतर दोन देवाचे राज्य प्रकट करू शकत नाहीत. जर ह्या तिन्ही गोष्टी एकत्रीत कार्य करीत नसतील तर आपण अपयशी ठरू. माझ्यामध्ये मोठा विश्वास आहे असे सांगणारे अनेक आहेत, पण प्रीतीविना तो निरर्थक आहे. अनेकांचे असे म्हणणे आही त्यांच्याठायी मोठी आशा आहे की भविष्यात कधीतरी सर्वकाही ठिक होईल. परंतु विश्वासाविना त्यांना ते पूर्ण झाल्याचे कधीच पाहायला मिळत नाही. असेही अनेक लोक आहेत जे इतरांसाठी स्वतःचा जीवनही देतात, परंतु विश्वास आणि आशेविना त्यांची प्रीतीही नैसर्गिक मर्यादेप्रतच राहील ती कधीच तिच्या खऱ्या पूर्णत्त्वास येणार नाही.

ह्या तिन्ही गोष्टी स्वतंत्रपणे पाहूया आणि मग देवराज्याच्या प्रसारासाठी ते कसे एकत्रीत कार्य करतात हे समजेल.

**प्रीती**

जे काही आम्ही करतो त्याचा विश्वास हा खरा पाया आहे. प्रीतीमुळेच देवाने त्याया पुत्रास आमच्यासाठी मरण्यास पाठवले. देव प्रीती आहे. प्रीतीमुले देव

कोण? त्याचे वैशिष्ट्य आहे ज्यामुले इतर दोघांचा बोध होतो.

प्रथम देवाचे आमच्यावरील प्रेम यावर भर द्यावा. पिता आमच्यावर किती प्रेम करतो हे कळल्यावाचून इतरांवर प्रेम करण्याचे आम्ही चुकवून जाऊ. राज्यात आम्ही काय करावे याची योग्य दिशा आम्हाला नाही. एकतर आम्ही जे करतो त्यातून देवावर आम्ही किती प्रेम करतो हे दाखवतो नाहीतर आमच्या करण्यामुळे इतरांवर किती प्रेम करतो हे दाखवतो.

लक्षात ठेवा ही वसती करण्याचे स्थान आहे. जसे योहान १५ मध्ये येशूने त्याच्यामध्ये राहण्यास सांगितले.

योहान १५ः४-५

४ तुम्ही माझ्यामध्ये राहा आणि मी तुमच्यामध्ये राहीन. जसे फाटा वेलात राहिल्यावाचून त्याला आपल्याआपण फळ देता येत नाही तसे माझ्यामध्ये राहिल्यावाचून तुम्हांलाही देता येणार नाही.

५ मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहात; जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करता येत नाही.

पौल पुढील उताऱ्यामध्ये सांगतो की देवाच्या परिपूर्णतेचे सादरीकरण करण्याची शक्यता, ख्रिस्ताच्या प्रेमाचे आमच्या प्रकटीकरणावर आधारित आहे. जितकी त्याची प्रीती ग्रहण करू तितके भरले जाऊ. जर आम्ही ख्रिस्ताची प्रीती ओळखून चालत नाही तर आम्ही देवाच्या सामर्थ्याने भरले जाणार नाही.

इफिस. ३ः१४-१९

१४, १५ ह्या कारणास्तव स्वर्गातील व पृथ्वीवरील प्रत्येक वंशास ज्या पित्यावरून नाव देण्यात येते, त्या पित्यासमोर मी गुडघे टेकून अशी विनंती करतो की,

१६ त्याने आपल्या ऐश्वर्याच्या समृद्धीप्रमाणे तुम्हांला असे दान द्यावे की, तुम्ही त्याच्या आत्म्याच्या द्वारे अंतर्यामी बलसंपन्न व्हावे;

१७ ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून

१८ तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती,

१९ हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घेण्यास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घेण्यास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे.

प्रेमाने ग्रासलेल्या ज्ञानाबद्दल पौल १९ त्या वचनात म्हणाला हे लक्षात घ्या.

ह्या प्रेमाविषयी फक्त समजणे पुरेसे नाही; तर त्याचा अनुभव घ्यावा आणि आमच्या जीवनातील प्रत्येकाचा पाया बनावा, जेव्हा आम्ही त्यात रोपलेले, लावलेले असू तेव्हाच या प्रेमाचे वर्णन करू शकू :

ग्रीफमध्ये हा शब्द ''काटालाबानो'' आहे. त्याचा अर्थ : उत्सुकतेने घेणे, घट्ट पकडणे, ग्रासले जाणे इ.

तो या शब्दांसाठी सुद्धा वापरला जातो : समजणे, प्राप्त करणे, येणे, आकलन होणे, सापडणे, लक्षात येणे, घेणे.

म्हणून जर आम्हाला घट्ट पकडून ग्रासले जायचे असेल, ख्रिस्ताच्या प्रेमाची लांबी, रुंदी, खोली, उंची समजून घ्यायची असेल तर आम्ही प्रीतीत मुळावलेले, रुजलेले असले पाहिजे. दुसरा पर्याय नाही, दुसरे मार्ग नाहीत. त्याच्या राज्यात नाहीत.

हे तेव्हा घडेल जेव्हा त्याची प्रीती समजून घेवू जेव्हा देवाच्या पूर्णतेने भरले जावू.

१ योहान ४:१२

१२ देवाला कोणी कधीही पाहिले नाही; आपण एकमेकांवर प्रीती करत असलो तर देव आपल्या ठायी राहतो, आणि त्याची प्रीती आपल्या ठायी पूर्णत्व पावली आहे.

१ योहान ४:१६

१६ देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे; जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो.

१ योहान ४:१८-१९

१८ प्रीतीच्या ठायी भीती नसते; इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते; भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही.

१९ पहिल्याने त्याने आपल्यावर प्रीती केली, म्हणून आपण प्रीती करतो.

देवाचे तुमच्यावरील प्रेम जाणून त्यावर तुम्ही विश्वास ठेवता का?

तुम्ही काहीही केल्याने पित्याचे तुमच्यावरील प्रेम बदलवू शकत नाही. तुम्ही त्याच्या अंतर्यामाची आस आहा; तो तुमच्यासाठी व्याकूळ होतो. का तुम्ही थांबून त्याला सांगत नाही की तुम्ही त्याच्या प्रेमावर विश्वास ठेवता. तुम्ही त्याला सांगा की त्याचे प्रेम तुम्हाला मिळाले व तुम्हावर वाहू द्या. तुम्ही काही केले, करता किंवा करणार योवर त्याचे प्रेम अवलंबून नाही. त्याने तुमच्यासाठी काय केले यावर त्याचे प्रेम आधारित आहे!

आम्हाला माहित आहे त्यापेक्षा अधिक त्याचे प्रेम आम्हाला एकाएकी मिळावे अशी पित्याची इच्छा आहे. त्यात आम्ही प्रवेश करतो ही त्याची कृपा आहे. मग त्यात राहण्यास आम्ही शिकण्याची गरज आहे.

आम्हावर किती प्रेम केले जावे हे जेव्हा कळेल तेव्हा आम्हास समजेल की देव आणच्यापासून काहीच राखून ठेवत नाही. येथेच आशेचा आरंभ होतो.

**आशा :**
आशा म्हणजे इच्छा करणे नव्हे. आशा म्हणजे अशी पात्रता की आत्म्यामध्ये काही वास्तव पाहणे. आशा व दृष्टांत हे बरोबरीने जातात. आशा नसेल तर दृष्टांत नाही.

मत्तय १२:२१

२१ आणि परराष्ट्रीय त्याच्या नावाची आशा धरतील.''

रोम. ४:१७-१८

१७ ''मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे;'' असे अब्राहामाविषयी शास्त्रात जे लिहिलेले आहे, त्याप्रमाणे तो आपल्या सर्वांचा बाप आहे. ज्या देवावर त्याने विश्वास ठेवला, जो देव मेलेल्यांना जिवंत करतो व जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो, त्याच्या दृष्टीने तो असा आहे.

१८ ''तशी तुझी संतती होईल'', ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला.

आशा नेहमी देवाच्या अभिवचनाने सुरू होते. देव म्हणाला, अब्राहाम पुष्कळ राष्ट्रांचा पिता होईल. देव तुमच्याविषयी काय म्हणतो? तुमच्या भविष्यासाठी त्याचे काय वचन आहे? वचन हे बीज असून त्याने आशा उपजविते, त्यामुळे विश्वास येतो व देवाच्या प्रीतीमध्ये परिपक्व होऊन या जगात देवाचे राज्य मुक्त केले जाते.

रोम. ५:१-५

